लोकमत

## व्यवस्थापन परिषद सदस्यांनी घेतली मुंबईत भेट : संशोधन, सामंजस्य करार, रोजगार उपलब्धतेबाबत चर्चा

# कुलपतींसमोर मांडली शिवाजी विद्यापीठाची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दीड वर्षातील शिवाजी विद्यापीठाची कामगिरी, विविध क्षेत्रांतील यशस्वी वाटचाल व्यवस्थापन परिषद सदस्यांनी कुलपती सी. विद्यासागर राव यांच्यासमोर गुरुवारी मुंबईत मांडली. संशोधन, सामंजस्य करार, स्थानिक पातळीवरील उद्योग-व्यवसायांसमवेत करार, शेतकऱ्यांना बळ, रोजगार उपलब्धता, आदींबाबत चर्चा झाली.



**मुंबई येथे गुरुवारी सदिच्छा भेटीप्रसंगी शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी यांनी कुलपती सी. विद्यासागर राव यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी शेजारी सदस्य एल. टी. भिसे, चंद्रशेखर कारंडे, संजय जाधव, धैर्यशील पाटील, डी. जी. कणसे, भारती पाटील, विवेक खानझोडे, आदी उपस्थित होते.**

राजभवनमध्ये गुरुवारी दुपारी साडेबारा ते दीड या वेळेत कुलपती राव यांनी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य ॲड. धैर्यशील पाटील, अमित कुलकर्णी, डॉ. भारती पाटील, संजय जाधव, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, चंद्रशेखर कारंडे, एल. टी. भिसे, विवेक खानझोडे यांच्यासमवेत चर्चा केली. त्यात या सदस्यांनी विद्यापीठाने देश-परदेशांतील विद्यापीठे, शैक्षणिक संस्था यांच्यासमवेत संशोधनासह उपक्रमांबाबत केलेले सामंजस्य करार, पदवी आणि पदव्युत्तर पातळीवरील संशोधनाचे प्रमाण वाढावे यासाठी सुरु केलेल्या योजना, नॅशनल सायबर सिक्युरिटी सेंटर, आदींची माहिती दिली. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विकासासाठी राबविलेले उपक्रम, योजनांची माहिती, यावर कुलपती राव यांनी काही सूचना केल्या.

दरम्यान, पदवी प्रमाणपत्र दुबार छपाई प्रकरणी चौकशी समितीच्या अहवालावरूनचा वाद, 'सुटा'ने सुरु केलेल्या आंदोलनामुळे वातावरण तापले आहे. याबाबत विद्यापीठ व कुलगुरुंची भूमिका मांडण्यासाठी या सदस्यांनी कुलपतींची भेट घेतली असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, व्यवस्थापन परिषद अस्तित्वात येऊन दीड वर्ष झाले आहे. त्या कालावधीत विद्यापीठाने विद्यार्थिकेंद्रित उपक्रम, योजना राबविल्या आहेत. त्यांचा आढावा मांडण्यासाठी कुलपतींची भेट घेतली असल्याचे अमित कुलकर्णी यांनी सांगितले. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील उद्योग, कंपन्यांसमवेत सामंजस्य करार करुन शेतकऱ्यांना बळ व विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पावले टाकावीत, अशी सूचना कुलपतींनी केली.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या या कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर. के. कामत, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. जगन कराडे, आदी उपस्थित होते.

लोकमत

## विज्ञान



डॉ. व्ही. एन. शिंदे

# हिममानव खरंच आहे?





मागील महिन्यात मेजर मनोज जोशी यांच्या नेतृत्वाखाली १८ गिर्यारोहकांचे पथक हिमालयात गिर्यारोहणासाठी गेले होते. अशा अनेक मोहिमा होत असतात. मात्र, ही मोहीम चर्चेत आली. या मोहिमेमुळे केवळ भारत नाही, तर, जगात नव्याने चर्चा सुरु झाली. जवळपास मागील दोनशे वर्षे चर्चेत असलेल्या हिममानवाला पुन्हा एकदा चर्चेत यावे लागले. या मोहिमेत त्यांना नेपाळमधील मकालू बेस कॅम्पजवळ साधारण ३२ इंच लांबी आणि १५ इंच रुंदी असणारे पावलांचे ठसे आढळले. त्यांनी त्याची छायाचित्रे घेतली. छायाचित्रण केले आणि परवा ही बातमी प्रसारित झाली. बातमीत पुढे असेही म्हटले आहे की, लष्कराजवळ असलेले पुरावे शास्त्रीय अभ्यासासाठी वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे दिले आहेत.

हिममानव किंवा यती आजवर एक रहस्य बनले आहे. कुठे त्याला वनदेवता मानतात. कोणी पर्वताचा देव म्हणते. कोठे त्याचा महाभयानक राक्षस म्हणून उल्लेख होतो. मात्र, विज्ञान आजही ठामपणे त्याचे अस्तित्व मान्य किंवा अमान्य करु शकलेले नाही. त्याला यती, हिममानव, बिगफूट, मेती, शुफपा, मिगो, कागमी आदी अनेक नावे देण्यात आली आहेत.

यतीला प्रथम पाहिल्याचा उल्लेख सन १८३२ मध्ये आहे. एका नेपाळी व्यापाऱ्याने नेपाळ तिबेट सीमेवर यतीला प्रथम पाहिल्याचा उल्लेख आढळतो. त्या व्यापाऱ्याला दहा फूट उंचीचा, सर्व अंग लालसर केसाने झाकलेला हिममानव दिसल्याचा उल्लेख आहे. त्याकाळात याचे शास्त्रीय विश्लेषण फारसे झाले नाही. सन १८६७ मध्ये पिटर रोगर्सन याला या हिममानवाची चित्रफीत घेता आली. मात्र, ती इतक्या दूरवरून घेतली होती आणि दाट धुके असल्याने ती स्पष्ट दिसत नव्हती. मात्र, त्यामध्ये जे काही दिसले ते पाहून यती असावा, यावर अनेकजण विश्वास ठेवू लागले. पुढे सन १८७२ आणि सन १८७७ मध्ये काही गिर्यारोहकांनी बर्फाळ प्रदेशात अतिशय मोठे मानवाच्या पायाचे ठसे पाहिल्याचे सांगितले. सन १८८९ मध्ये कर्नल बेडले यांनी असेच पावलाचे ठसे पाहिले. त्यानंतर सन १९०६ मध्येही हेन्री एल्यूस यांनी असेच निरीक्षण नोंदवले. मात्र, याकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिले गेले नाही.

यतीला पाहण्याचा दावा सन १९२५ मध्ये एका जर्मन छायाचित्रकाराने केला. त्यांना बर्फावरुन एक विशालकाय प्राणी जाताना दिसला. तो माणसासारखा होता. मात्र, त्याने कपडे घातले नव्हते. सन १९४४ मध्ये वुड किकलँड यांनीही असेच निरीक्षण नोंदवले. सन १९४८ मध्ये नॉर्वेतील फ्रॉस्टीस आणि यारवर्ग यांनी त्याच्या पाऊलखुणांचा पाठलाग केल्यानंतर त्यांना दोन यती दिसल्याचे त्यांनी सांगितले. आपण हिममानवाशी झटापट केल्याचे आणि साथीदाराचा जीव वाचवण्यासाठी गोळी झाडल्याचे सांगितले. त्यानंतर सन १९५१, सन १९५३, सन १९७०, सन १९७६ या वर्षात यतीला विविध लोकांनी पाहिल्याचे सांगितले.

त्याचे जे-जे अवयव आहेत, असा संशय आला, त्यांचे वैज्ञानिक पृथ्थकरण करण्यात आले. मात्र, त्यामध्ये संशोधकांना नव्या अज्ञात प्राण्याच्या अस्तित्वाची साक्ष पटली नाही. केस, मल, कवटी असे जे काही मिळाले, त्या सर्वांचा शास्त्रीय अभ्यास केला गेला. मात्र, ते अस्तित्वात असलेल्या किंवा असणाऱ्या प्राण्यांच्या घटकांशी किंवा अवयवांशी मिळणारे होते. जे लोक आपण प्रत्यक्ष हिममानवास पाहिल्याचे सांगतात, त्यांच्या सांगण्यानुसार त्याचा आकार अवाढव्य आहे. त्याच्या अंगावर भरपूर केस असतात. ते जेथून जातात तेथे कस्तुरीसारखा सुगंध दरवळतो. त्याला बोलता येत नाही, मात्र, तो विचित्र आवाज काढतो. तो कच्चे मांस, कंदमुळे आणि फळे खातो.

मात्र, आजही याच्या वास्तव्याचे वैज्ञानिक पुरावे उपलब्ध नाहीत. आजही त्याचे अस्तित्व विज्ञान मान्य करत नाही. ज्या आकाराचे ठसे आढळल्याचा आताचा दावा आहे, तो आकार मानवी पावलावरुन मिळू शकत नाही. मात्र, केवळ तेवढा पुरावा या यतीचे अस्तित्व मान्य करायला पुरेसा नाही. आणखी ठोस पुरावे आल्याखेरीज विज्ञान यती आहे, असे ठामपणे मान्य करणार नाही.

(लेखक विज्ञान व तंत्रज्ञान विषयाचे अभ्यासक आणि शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव आहेत.)

# ‘व्यवस्थापन’चे सदस्य कुलपतींच्या भेटीला

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या आठ सदस्यांनी राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव यांची गुरुवारी भेट घेतली. त्यांनी विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक उपक्रमांची कुलपतींना माहिती दिली. शिष्टमंडळाला मार्गदर्शन करताना राव यांनी, ‘विद्यापीठाने ऊस, गूळ व चर्मोद्योगावर संशोधन करुन विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात’ असे आवाहन केले.

विद्यापीठातील सध्याच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर व्यवस्थापन परिषद सदस्यांनी घेतलेली भेट व ‘सुटा’तर्फे मुंबई येथे सहा मे रोजीच्या आंदोलनाची घोषणा या दोन्ही घटना शैक्षणिक वर्तुळात चर्चेच्या ठरल्या आहेत. विकास आघाडीशी निगडीत व कुलपती नियुक्त सदस्य मिळून व्यवस्थापन परिषदेमधील आठ जणांनी गुरुवारी दुपारी राजभवन येथे कुलपतींची भेट घेतली. व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी यांनी ‘गेल्या दीड वर्षांच्या कालावधीत विद्यापीठाच्या हिताच्या विविध योजनांची अंमलबजावणी झाली आहे. व्यवस्थापन परिषदेचा विद्यार्थीकेंद्रित व सकारात्मक कामकाजावर भर आहे. तसेच विद्यापीठ कायदा व परिनियमावलीचे उल्लघंन होणार नाही यासाठी परिषद प्रयत्नशील आहे,’ अशी माहिती दिली.



शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्यांमार्फत राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव यांचा सत्कार करताना सदस्य अमित कुलकर्णी. सोबत डावीकडून डॉ. लोभाजी भिसे, डॉ. चंद्रशेखर कारंडे, संजय जाधव, अॅड. धैर्यशील पाटील, प्राचार्य धनाजी कणसे, डॉ. भारती पाटील, डॉ. विवेक खानझोडे आदी.

**विद्यापीठातील विविध उपक्रमांची दिली माहिती**

शिष्टमंडळात सदस्य डॉ. विवेक खानझोडे, डॉ. भारती पाटील, संजय जाधव, अॅड. धैर्यशील पाटील, लोभाजी भिसे, डॉ. चंद्रशेखर कारंडे, प्राचार्य डॉ. धनाजी कणसे आदींचा समावेश होता. शिष्टमंडळातील सदस्यांशी चर्चा करताना राज्यपालांनी विद्यापीठाने संशोधनाच्या माध्यमातून कष्टकरी व शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावेल यासाठी प्रयत्नशील राहावे असे नमूद केले.

अनेक उपक्रम स्तुत्य

शिवाजी विद्यापीठाने शहीद जवानांना मुलांना मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध केली आहे. तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एक हजार मुलींना मोफत एसटी प्रवासाची सुविधा निर्माण केली आहे. हे दोन्ही निर्णय ग्रामीण भागातील मुला, मुलींना उच्च शिक्षणाच्या संधी निर्माण करण्यासाठी मोलाच्या आहेत असे गौरवोद्गार राज्यपाल राव यांनी काढले.

पुढारी

# ऊस, गुळासह चर्मोद्योगावर अधिक संशोधनाची गरज

## राज्यपाल सी. विद्यासागर राव : विद्यापीठ सिनेट सदस्यांशी चर्चा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्ह्याचे प्रमुख अर्थकारण असलेल्या ऊस, गूळ व चर्मोद्योग याबाबत शिवाजी विद्यापीठाचे अधिक संशोधन करावे, अशी अपेक्षा राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य यांनी राज्यपाल राव यांची मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. या भेटीत राज्यपाल बोलत होते.

राज्यपाल राव यांना सिनेट सदस्यांनी विद्यापीठाच्या विकासात्मक उपक्रमांची माहिती दिली. विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता वाढत असल्याचेही यावेळी सदस्यांनी स्पष्ट केले. यावेळी कोल्हापूर, सांगली व सातारा या परिसराची स्थानिक बलस्थाने ओळखून संशोधनावर भर द्यावा, असे राज्यपाल राव यांनी सांगितले. यावेळी विद्यापीठाच्या विविध उपक्रम व योजनांना मंजुरी देऊन विकासाला पाठबळ दिल्याबद्दल राज्यपाल राव यांचा सिनेट सदस्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी अमित कुलकर्णी, लोबाजी भिसे, संजय जाधव, अॅड. धैर्यशील पाटील, डॉ. धनाजी कणसे, डॉ. भारती पाटील, डॉ. विवेक खांझोडे आदी उपस्थित होते.



**मुंबई : राज्यपाल सी. विद्यासागर राव यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना अमित कुलकर्णी. सोबत लोबाजी भिसे, संजय जाधव, धैर्यशील पाटील, भारती पाटील, धनाजी कणसे आदी.**

Kolhapur Edition
3 May, 2019 Page No. 9
Powered by : erelego.com

# डॉ. शालिनी लिहितकर यांचा आंतरराष्ट्रीय परिषदेत गौरव



**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. शालिनी लिहितकर यांना नवी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत 'इंडियन लायब्ररी लीडर्स अॅवॉर्ड फॉर प्रोफेशनल एक्सलन्स' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. नवी दिल्ली येथे १९-२० एप्रिल रोजी दिल्ली ग्रंथालय संघ आणि सतीजा रिसर्च फौंडेशन फॉर लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरी ग्रंथालय व माहितीशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषद झाली. ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल डॉ. लिहितकर यांना विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ अशोक बेरी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी एन.आय.सी.चे माजी संचालक डॉ. एम. मणी, डॉ. पी. बी. मंगला, डॉ. एम. पी. सतीजा, डॉ. सी. पी. वसिष्ठ, दिल्ली ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. आर. के. शर्मा, सतीजा रिसर्च फौंडेशनचे अध्यक्ष डॉ. के. पी. सिंग आदी उपस्थित होते. त्यांच्या यशाबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.